## स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण

पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण, आडगाव, नाशिक-पिन ४२२००३

दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० **E.Mail- pilcbnskr@gmail.com**


---

**प्रेसनोट** दिनांक:- ०९/१०/२०१८

## देवळा व घोटी परिसरातील अवैध गावठी दारू हातभट्टयांवर स्थानिक गुन्हे शाखेचे छापे

---

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो** यांनी आदेशित केले प्रमाणे जिल्हयातील अवैध धंदयाचे समुळ उच्चाटन होणेसाठी अवैधरित्या मद्याची वाहतुक व विक्री करणारे, तसेच हातभट्टीची गावठी दारू तयार करणारे इसमांवर सत्वर कारवाई करण्यात येत आहे. त्यानुसार **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांचे पथकांनी घोटी व देवळा परिसरातील अवैधरित्या सुरू असलेले गावठी दारू हातभट्टीचे अड्डे उध्वस्त करून मुंबई दारूबंदी कायद्यान्वये ०४ गुन्हे दाखल केले आहे.

नाशिक जिल्हयातील अतिदुर्गम भागात डोंगर, द-यांमध्ये काही इसम अवैधरित्या हातभट्टीची गावठी दारू तयार करतात बाबत स्थानिक गुन्हे शाखेचे पथकास माहिती मिळाली होती, त्यानुसार पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी आज दि. ०९/१०/२०१८ रोजी पहाटेचे सुमारास इगतपुरी तालुक्यातील **घोटी हद्दीत खैरगाव भल्याची वाडी शिवारात मोराचे डोंगराचे** पायथ्याशी अचानकपणे छापे टाकुन गावठी दारूचे अड्डे उध्वस्त केले. सदर ठिकाणी इसम नामे **१) दुलाजी बुधा शिद, २) गोरख वाधु फोडसे, ३) सोमनाथ अनाजी भले,** सर्व रा. खैरगाव भल्याची वाडी, ता.इगतपुरी हे विनापरवाना बेकायदा अंबट उग्र वासाची गावठी दारू तयार करतांना मिळुन आले असुन त्यांचे गावठी तयार करण्यासाठी लागणारे १०,००० लिटर नवसागर मिश्रीत रसायन, ५० प्लॅस्टीक व पत्राचे ड्रम, ॲल्युमिनियमचे पातेले, तयार गावठी दारू व इतर साहित्यसाधने असा **एकुण ०५ लाख २९ हजार १०० रू. किंमतीचा मुद्देमाल जप्त** करण्यात आला आहे. वरील तिनही आरोपीतांविरूध्द **घोटी पोलीस ठाणेस मुंबई दारूबंदी कायदयान्वये ०३ गुन्हे दाखल** करण्यात आले आहे.

तसेच स्थागुशाचे दुसरे पथकाने देवळा तालुक्यातील लोहणेर गावचे शिवारात गिरणा नदी पात्रात अवैधरित्या सुरू असलेले गावठी दारूचे अड्डे उध्वस्त केले. सदर ठिकाणी **इसम नामे १) उलशा रूंजा वाघ, रा. लोहणेर, ता. देवळा** हा गिरणा नदी पात्रात विनापरवाना बेकायदा अंबट उग्र वासाची गावठी दारू तयार करतांना मिळुन आला असुन त्याचे कब्जातुन गावठी तयार करण्यासाठी लागणारे साहित्यसाधने असा **एकुण ३३ हजार ७८० रू. किंमतीचा मुद्देमाल जप्त** करण्यात आला आहे. वरील आरोपीविरूध्द **देवळा पोलीस ठाणेस मुंबई दारूबंदी कायदयान्वये गुन्हा दाखल** करण्यात आला आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो. व अपर पोलीस अधीक्षक श्री. विशाल गायकवाड सो. यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे, पोउनि स्वप्निल नाईक, सपोउनि नवनाथ गुरूळे, पोहवा राजु दिवटे, बंडु ठाकरे, शिवाजी जुंदरे, पोकॉ संदिप हांडगे, सचिन पिंगळ, लहु भावनाथ यांचे पथकाने घोटी व देवळा हद्दीतील अवैध गावठी दारू हातभट्टयांवर छापे टाकुन दारूबंदी कायदयान्वये **एकुण ०४ गुन्हे दाखल केले असुन सुमारे ५,६२,८८० रू.** किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. जिल्हयातील अवैध धंदयांचे समुळ उच्चाटन होणेसाठी आगामी काळात अवैध धंदयांवर सतत कारवाई सुरू राहणार आहे.